



# 'उत्कृष्ट' विभाग

## अनुक्रम

१. सन्मानपत्र
२. 'उत्कृष्ट' पत्र
३. अभिनंदन
४. अभिनंदन
५. काही 'उत्कृष्ट' प्रतिक्रिया
*अ) 'सर्वोत्कृष्ट' महाविद्यालयविषयक*
*ब) 'अगस्त्य' (२००५-०६) विषयक*
६. ...येथे कर माझे जुळती !
७. महाविद्यालयाचे व माझे पहिले यश

One that desires to excel should endeavour it in those things that are in themselves most excellent. - Epictetus.

## पुणे विद्यापीठ

# प्रशस्तिपत्र

पुणे विद्यापीठाच्या 'गुणवत्ता सुधार योजने'अंतर्गत शैक्षणिक वर्ष २००६-२००७ साठीचा ग्रामीण विभागातील 'सर्वोत्कृष्ट संलग्न महाविद्यालय' पुरस्कार **अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले, जि. अहमदनगर** या महाविद्यालयास प्रदान करण्यात येत आहे.

१० फेब्रुवारी, २००७

कुलगुरू

पुणे विद्यापीठ, पुणे

# विद्यार्थी कल्याण मंडळ

सन २००५ - ०६

# प्रमाणपत्र

अगस्त्य

कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय,

अकोले, जि. अहमदनगर.

यांना पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळा तर्फे

घेतलेल्या नियतकालीका स्पर्धेमध्ये

विद्यापीठ स्तर व्दितीय क्रमांक

मिळाल्याबद्दल हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

डॉ. संभाजी पठारे

संचालक

# मोहर उत्कृष्टतेची ! तीन पुरस्कारांची !!!




सर्वोत्कृष्ट ग्रामीण महाविद्यालय :

पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत शै.वर्ष २००६-०७ साठीचा ग्रामीण विभागातील सर्वोत्कृष्ट संलग्न महाविद्यालय पुरस्कार मा.कुलगुरू डॉ.नरेंद्र जाधव यांचे हस्ते स्वीकारल्यानंतर एका प्रसन्न क्षणी मा.प्राचार्य रमेशचंद्र खांडगे (व्यासपीठावर - डॉ.श्रीराम लागु, श्री.विखे पाटील, डॉ.पंडित विद्यासागर) (विद्यापीठ वर्धापन दिन : १० फेब्रु.२००७)

उत्कृष्ट नियतकालिक :

पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळातर्फे घेतल्या जाणाऱ्या महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेमध्ये **अगस्त्य** (२००५-०६) नियतकालिकाला विद्यापीठस्तरीय द्वितीय क्रमांक मिळाला. मा.कुलगुरु डॉ.नरेंद्र जाधव यांचे हस्ते पुरस्कार, प्रमाणपत्र स्वीकारताना मा.प्राचार्य रमेशचंद्र खांडगे, संपादक प्रा.डॉ.विजय बाणकर व संपादक मंडळ सदस्य प्रा.आत्माराम काळे.





गुणवंत शिक्षकेतर सेवक : **श्री.जयराम पथवे**

पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत शै.वर्ष २००६-०७ साठीचा 'गुणवंत शिक्षकेतर सेवक पुरस्कार' विद्यापीठ वर्धापन दिनी मा.कुलगुरु डॉ.नरेंद्र जाधव यांचे हस्ते स्वीकारताना

# आनंद सोहळा



पुणे विद्यापीठाकडून लाभलेले स्मृतिचिन्ह प्राचार्य श्री. शिरगुरकर
व अ.ता.ए.सो.चे मा. विश्वस्त श्री. लालचंदजी शहा
यांचे हस्ते स्वीकारताना मा. प्राचार्य



सर्वोत्कृष्ट ग्रामीण महाविद्यालय म्हणून पुरस्कार
मिळाल्याबद्दल अ.ता.ए.सोसायटीकडून
सन्मानपत्र स्वीकारताना



अगस्त्य नियतकालिकास विद्यापीठस्तरीय द्वितीय क्रमांक
मिळाल्याबद्दल संस्थेकडून अभिनंदन पत्र स्वीकारताना संपादक
प्रा. डॉ. विजय बाणकर



पुणे विद्यापीठाकडून गुणवंत शिक्षकेतर सेवक पुरस्कार
मिळाल्याबद्दल संस्थेकडून अभिनंदन पत्र स्वीकारताना
श्री.जयराम पथवे

# डॉ.नरेंद्र जाधव : विभागांना भेटी



मा.कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव यांना आपल्या बॉटनिक गार्डन ची वैशिष्टये सांगत तिकडे घेऊन जाताना वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. बाबासाहेब देशमुख (सोबत मा.कुलगुरुंच्या डावीकडे मा. डॉ.बी.जी.बंगाळ,विश्वस्त, अ.ता.ए.सो.व प्राचार्य श्री. रमेशचंद्र खांडगे.



वनस्पतीशास्त्र प्रयोगशाळेची पाहणी करताना मा.कुलगुरु, त्यांचे पुढे प्रा.राहुल वाघमारे व डावीकडे विभागप्रमुख प्रा.डॉ.बाबासाहेब देशमुख



पदार्थविज्ञान विभागात चर्चा करताना मा.कुलगुरु डॉ.नरेंद्र जाधव, डावीकडे मा. प्राचार्य, उजवीकडे प्रा.डॉ.अविनाश झांबटे, विभाग प्रमुख प्रा.अशोक भाटे, मागे प्रा.अशोक दातीर व प्रा.भिमाजी पळसकर

रसायनशास्त्र प्रयोग शाळेत मा.कुलगुरु डॉ.नरेंद्र जाधव यांचेशी वार्तालाप करताना विभाग प्रमुख प्रा.संजय ताकटे





मा.कुलगुरु साहेबांना प्राणिशास्त्र विभागातील संग्रहाची माहिती सांगताना विभाग प्रमुख प्रा.केशव नाईकवाडी





ARTS & COMM. COLLEGE LIBRARY

# 'उत्कृष्ट' पत्र

सु प्रसिध्द गायक **श्री. मुकुंद फणसळकर** यांचे हस्ते २००१-२००२ या शैक्षणिक वर्षीच्या कला मंडळाचे उदघाटन करण्यात आले होते. त्यानंतर **ललित छल्लारे** या विद्यार्थ्याने त्यांना एक पत्र व प्रेझेंट पाठवले होते. या पत्रास प्रतिसाद म्हणून श्री. फणसळकर यांनी स्वतःच्या सुंदर हस्ताक्षरात ११ फूलस्केप पानांचे पत्र त्याला पाठवले होते. आदर्श पत्राचा एक नमुना असाच या पत्राचा उल्लेख करणे योग्य होय.

महाविद्यालय व माननीय प्राचार्य यांच्या विषयीचे मत त्यांनी त्यात व्यक्त केले आहे. तो परिच्छेद 'उत्कृष्ट महाविद्यालय' म्हणून पुरस्कार' मिळालेल्या २००६-०७ या वर्षीच्या नियतकालिकात समाविष्ट करणे पुष्टिदायक 'दुधात साखर' या न्यायाने उचित ठरावे. -

''तुमच्या पत्रात तुम्ही तुमच्या कॉलेजमधल्या अध्यापकवर्गाचं, कर्मचारी मंडळींचं आणि प्राचार्यांचं वर्णन केलेलं आहे त्याचा प्रत्यय मला त्या दिवशी अल्पावधीतच आला. विशेषतः प्राचार्यांच्या व्यक्तिमत्त्वाने मी भारावून गेलो. माझ्या व्यवसायामुळे मला भरपूर प्रवास करायला मिळालेले आहेत आणि त्यायोगे अनेक ठिकाणच्या शाळा कॉलेजांशी संपर्क आलेला असल्याने मला अगणित शिक्षक - अध्यापक - प्राचार्यांना भेटण्याची संधी प्राप्त झालेली आहे. माणसांचे असंख्य नमुने पहायला मिळाले आहेत. या पार्श्वभूमीवर खांडगे सरांचे मोठेपण माझ्या मनावर अधिकच ठळकपणे ठसलं. इतरत्र अनेक ठिकाणी 'विद्यार्थ्यांचा काय गुन्हा आहे म्हणून त्यांना हे असे मास्तर मिळावेत ?' असा प्रश्न मनात उभा राहतो. तुमच्या कॉलेजमध्ये मात्र तुम्हा विद्यार्थीमंडळींचं पुण्य थोर म्हणून असे प्राचार्य आणि शिक्षक तुम्हाला लाभले, की ती प्राध्यापक मंडळी भाग्यवान म्हणून तुम्हा मुलांसारखा विद्यार्थीवर्ग त्यांना मिळाला, हे ठरवणं अवघड आहे.''

If you wish your merit to be known, acknowledge that of other people. -*Oriental Proverb.*





## ॥ अभिनंदन ॥

प्रति,

**प्रा. डॉ. विजय बाणकर**
संपादक, अगस्त्य (२००५-०६)
अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय,
अकोले, जि. अहमनगर.

पुणे विद्यापीठातर्फे दरवर्षी विद्यापीठ कक्षेतील महाविद्यालयांकडून प्रकाशित होणाऱ्या नियतकालिकांमध्ये, शैक्षणिक वर्ष २००५-२००६ च्या आपल्या महाविद्यालयाच्या 'अगस्त्य नियतकालिकास' विद्यापीठ स्तरावरील व्दितीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला, ही अतीव समाधानाची बाब होय. संपादक म्हणून आपण केलेले काम कौतुकास्पद आहे.

तत्त्वज्ञानाचे अभ्यासक, संशोधक या नात्याने आपण केलेल्या साक्षेपी संपादनामुळे 'अगस्त्य' नियतकालिकाने संदर्भीय उंची गाठली आहे. त्यात मराठी साहित्यपीठाला 'ज्ञानपीठा'ची श्रीमंती देणाऱ्या विंदा करंदीकररांचे मनापासून अभिनंदन करीत वैशिष्ट्यपूर्ण **'विंदावन'** (नामक विभागीय दालन) **'अगस्त्य'** दारीं उभारले आहे, ही त्यातील आपली समयोचित कामगिरी होय.

'महर्षी अगस्तींपुढे नम्र झालेला विंध्य पर्वत' हे मुखपृष्ठावरील रेखाचित्र हा जणुकाय आपल्या अध्यात्मज्ञानप्रधान भारतीय संस्कृतीचा सूचक आलेखच होय.

आपण व आपले सहकारी यांच्या या संपादकीय कामगिरीमुळे महाविद्यालयाच्या लौकिकात मोलाची भर पडली आहे.

या पत्राद्वारे अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी आपले सानंद अभिनंदन करीत आहे.

**विठ्ठलराव चासकर** — अध्यक्ष,
**ॲड. के.बी. हांडे** — सेक्रेटरी,
अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी, अकोले, जि. अहमदनगर

**आनंद सोहळा,**
दि. २०/२/२००७

( **दै. लोकमत** मधील 'दखलपात्र *अगस्त्य* नियतकालिक' प्रतिक्रियात्मक लेखाधारे सदर अभिनंदन पत्राचा मसुदा तयार करण्यात आला आहे.)

Next to excellence is the appreciation of it. - *Thackeray.*





## ॥ अभिनंदन ॥

प्रति,

**श्री. जयराम देवराम पथवे**

अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय,

अकोले, जि. अहमदनगर

पुणे विद्यापीठाच्या **'गुणवत्ता सुधार योजने'** अंतर्गत शैक्षणिक वर्ष २००६-०७ साठीचा 'गुणवंत शिक्षकेतर सेवक पुरस्कार' विद्यापीठ वर्धापन दिनीं (१० फेब्रुवारी २००७ रोजी) मा. कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांचे हस्ते आपणास प्रदान करण्यात आला.

शिपाई व प्रयोगशाळा परिचर म्हणून एकूण सतरा वर्षे आपण महाविद्यालयात सेवारत आहात. विश्वासार्ह, उत्कृष्ट वर्तणुक, उद्योगप्रियता, अचूक व नियमित काम, कामाविषयी आत्मीयता, सहकार्याची व सहभागाची भावना, कामाची सखोल माहिती व संगणकविषयक ज्ञान या व यासम बाबी आपल्या ठिकाणी असल्याचे संस्थेला ज्ञात होते व आहे.

वाचन, लेखन व पुस्तकांचा संग्रह करणे हे आपल्या ठायीचे विशेष होत.

महाविद्यालयात कार्यरत असतांना आपल्याला 'आदिवासी महासंघ', संगमनेर-पुणे यांचेकडून राज्यस्तरीय 'आदिवासी भूषण पुरस्कार' मिळाला आहे. तसेच आकाशवाणीच्या अहमदनगर, पुणे व मुंबई केंद्रावर 'वाचन आणि ग्रंथालय' या विषयावर आपली मुलाखत प्रसारित झाली आहे.

अनेकांना प्रेरणा देणाऱ्या आपल्या या विकसनशील कामगिरीबद्दल अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी या पत्राद्वारे मन:पूर्वक अभिनंदन करीत आहे.

आनंद सोहळा,
दि. २०/२/२००७

विठ्ठलराव चासकर — अध्यक्ष
ॲड. के. बी. हांडे — सेक्रेटरी

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी, अकोले, जि. अहमदनगर

Every man is valued in this world as he shows
by his conduct that he wishes to be valued. - *Bruyere*





# काही 'उत्कृष्ट' प्रतिक्रिया

**1**

दि.२७/०२/२००७

**आदरणीय प्राचार्य खांडगे साहेब,**

साष्टांग नमस्कार.

दीर्घ संशोधन प्रकल्पांतर्गत घ्यावयाच्या कार्यक्रमामुळे अभिनंदन करण्यास उशीर झाला असला तरी आनंदाला उणेपणा आलेला नाही. 'उत्कृष्ठ महाविद्यालय', 'उत्कृष्ट नियतकालिक', 'उत्कृष्ट कर्मचारी' अशा उत्कृष्टांच्या पुष्पांची माला गुंफून अकोलेवासीयांची शान व मान उंचावल्याबद्दल मन:पूर्वक अभिनंदन !

सह्याद्रीच्या कुशीत राहून तसेच कणखर व परिस्थितीशी टक्कर देणारे विद्यार्थी व नागरिक घडविण्याचे काम आपण अविरतपणे केलेले आहे... महाराष्ट्रभर विखुरलेले असे विद्यार्थी व त्यांच्या तोंडी असलेले आपले व आपल्या महाविद्यालयाचे नाव ही आपल्या कामाचीच नोंद आहे. अशा नोंदीला आता प्रत्यक्षरूप व विद्यापीठ-मान्यतेची मोहर उमटण्याचे भाग्य (आपल्याला) लाभले आहे. अकोले परिसरातील माझ्यासारख्या सुनेच्या व आपल्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने ही अतिशय आनंददायी, अभिमानास्पद व प्रोत्साहक बाब आहे.

महाविद्यालय चालविणे म्हणजे बुध्दिवंतांची नौका चालविणे आहे. साहजिकच अशा नौकेचा नावाडीही तितकाच कुशल असला पाहिजे. ती कुशलता आपणाजवळ असल्यानेच महाविद्यालयाची यशोगाथा सर्वदूर पसरू शकली, विद्यापीठाला त्याची नोंद घ्यावी लागली. यशाची, उत्कर्षाची ही घोडदौड अशीच होत राहो व राष्ट्रस्तरावर आपला गौरव-सन्मान होवो, हीच या प्रसंगी सदिच्छा !...

आपली विनीत,

*स्वाक्षरीत*

**प्रा. डॉ. उज्ज्वला जाधव-भोर**
पाथर्डी, जि. अहमदनगर

We should allow others' excellences, to preserve modest opinion of our own. - *Barrow*





**2**

दि. १०/०२/२००७

**प्रिय सन्मित्र**
**प्राचार्य रमेशचंद्रजी खांडगे,**

स. न. वि. वि.

आपल्या महाविद्यालयाला ग्रामीण भागातील उत्कृष्ट महाविद्यालय म्हणून प्रथम क्रमांक मिळाला हे ऐकून, पाहून, वाचून विशेष सानंद अभिमान वाटला. आपण झोकून देऊन, समावेशकतेने, चिकाटीने आणि बांधिलकीने केलेल्या कामाची यथोचित पावती आपणास मिळाली आहे. संधीचे सार्थक केलेत, मान उंचावली, कार्यकर्त्यांची स्वप्नपूर्ती केलीत. मन:पूर्वक अभिनंदन ...!

स्नेहांकित,

*स्वाक्षरीत*

**प्राचार्य डॉ. अ. ना. सहस्रबुद्धे,**
पेमराज सारडा कॉलेज, अ'नगर

**3**

प्रति,                                   दि. १३/०२/२००७

**मा. प्राचार्य श्री. खांडगे सर,**

स. न. वि. वि.

आपल्या महाविद्यालयाला पुणे विद्यापीठाच्या कक्षेतील ग्रामीण भागात प्रथम क्रमांकाचे महाविद्यालय म्हणून पुरस्कार मिळाला त्याबद्दल आपले मनापासून अभिनंदन करीत आहे.

आपले महाविद्यालय महाराष्ट्रातील अतिशय मागासलेल्या व आदिवासी भागातील महाविद्यालय आहे. असे असून सुद्धा आपल्या नेतृत्वाखाली आपल्या सहकारी प्राध्यापकांच्या सहकार्याने आपण ही प्रगती केलेली आहे. ग्रामीण भागात काम करताना किती अडचणी येतात याची मला जाणीव आहे. शासन, संस्थाचालक, विद्यार्थी, पालक, राजकीय नेते या सर्वांचा समन्वय साधून काम करतांना प्राचार्यांजवळ संस्थेच्या विकासाची दृष्टी असावी लागते. ही दृष्टी आपल्याजवळ असल्याकारणाने अनेक अडचणींवर मात करून आपण हे यश मिळविले आहे. ...... आपल्या कुशल नेतृत्वाचा फायदा ग्रामीण जनतेला मिळो, ही शुभेच्छा.

आपला,

*स्वाक्षरीत*

**(माजी प्राचार्य) ज. कि. जामकर**
म.सं.थोरात कनिष्ठ महाविद्यालय,
जोर्वे, ता. संगमनेर.

**आव्हाने पेलतच शेवटी एक चांगली व्यक्ती बनाल.**

दि. १७/०२/२००७

**आदरणीय खांडगे सर,**

स. न. वि. वि

आपल्या महाविद्यालयास पुणे विद्यापीठाचा ग्रामीण भागातील 'सर्वोत्तम' महाविद्यालयाचा पुरस्कार मिळाल्याचे वाचून अत्यंत आनंद झाला. 'सर्वार्थाने' महाविद्यालय घडवण्यात आपण व आपला स्टाफ या सर्वांचा 'सिंहाचा वाटा' आहे. ग्रामीण (आदिवासी) भागातील मुलांवर शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक संस्कार घडवण्याचे आपले कार्यास उत्तरोत्तर यश लाभो.

स्नेहांकित,

*स्वाक्षरीत*

डॉ. दिनेश वाघोलीकर,
एम्. डी. (मेडिसीन, एफ्. सी. सी. पी.)
संगमनेर - ४२२ ६०५



दि. १८/०२/२००७

प्रति

**प्राचार्य रमेशचंद्र खांडगे,**

अकोले,

उत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार आपल्या महाविद्यालयाला देऊन पुणे विद्यापीठाने आदिवासी व दुर्गम भागात कार्यरत असणाऱ्या महाविद्यालयाला न्यायच दिला आहे.

महाविद्यालयाच्या इतिहासात आपला प्राचार्यपदाचा कार्यकाळ अविस्मरणीय असाच आहे. आपली स्वत:ची अशी एक निश्चित दिशा स्वीकारून स्वत:ला कृतिगध्ये झोकून देऊन ... शिक्षण क्षेत्रातल्या वास्तव परिस्थितीशी सामना करून (आपण) केलेल्या यशस्वी वाटचालीमुळेच महाविद्यालयाला हे यश संपादन करता आले.

विजेते वेगळ्या गोष्टी करत नाहीत. ते प्रत्येक गोष्ट वेगळेपणाने करतात...

आपल्याला मिळालेल्या यशाबद्दल आपले अंत:करणपूर्वक अभिनंदन करून आपल्या भावी वाटचालीस निर्लेप शुभेच्छा देतो.

आपला,

*स्वाक्षरीत*

**विकासराव क. पा. शेटे,**
अध्यक्ष, अकोले तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी.





6

दि. १३ /०२/ २००७

चि. रा. रा. रमेशचंद्र खांडगे,
प्राचार्य,
आर्ट्स, कॉमर्स व दादासाहेब रुपवते सायन्स कॉलेज,
अकोले, अहमदनगर.

अनंत मंगलाशिष !

... कॉलेज वटबीजाचे आरोपण झाले त्या क्षणाचा मी साक्षीदार होतो. त्यातून प्रकटलेला विद्यमान विशाल वटवृक्ष पाहिल्यानंतर माझ्या तत्कालीन सहकारी बांधवांप्रमाणे मलाही 'अद्यमे सफला जन्मा - अद्यमे सफला क्रियाम' असा साक्षात्कार झाला. .. आपल्या कॉलेजचे हे भव्य स्वरूप आणि तुमचे कार्यकर्तृत्व पाहून जो अत्यानंद झाला आणि ज्या 'भावना दाटुनि आल्या' त्यांचे वर्णन करण्यास माझ्याजवळ पुरेसे शब्द नाहीत. हल्लीच्या भाषेत तुमच्या कार्यकर्तृत्वाला सलाम करतो.

तुमचे सर्व सहकारी प्राध्यापक, कर्मचारी मौक्तिक मालेप्रमाणे आहेत आणि तुम्ही ? त्या माळेचे रत्नजडित पदक आहात !

उत्कृष्ट कॉलेज अन् उत्कृष्ट कॉलेज नियतकालिक (अगस्त्य) म्हणून दोन्ही घटकांना नामांकन, मानांकन मिळाले हा दुग्धशर्करा - मणिकांचन स्वरूपाचा समसमा संयोग आहे. ....

कॉलेजच्या जन्मापासूनचा एक साक्षीदार या नात्याने ही सर्व स्थित्यंतरे पाहून निरतिशय आनंद वाटतो. तुमचे व तुमच्या सर्व सहकाऱ्यांचे उत्कट, हार्दिक अन् मन:पूर्वक अभिनंदन !

आगे बढो - बढते चलो .. विजयोस्तुते .. या मंगल कामना प्रविष्ट करीत आहे.

आपलाच,

स्वाक्षरीत

अनंत दत्तात्रय देशपांडे,
माजी प्राचार्य, मॉडर्न हायस्कूल
व ज्युनियर कॉलेज, अकोले, अहमदनगर.

One ounce of practice is worth twenty thousand tons of big talk. - Swami Vivekanand.





**7**

दि. ११ फेब्रुवारी २००७

प्रति,

**आदरणीय रमेशचंद्रजी खांडगे सर,**

प्राचार्य,

अगस्ति.... महाविद्यालय, अकोले, जि. अ'नगर.

... आपले हार्दिक अभिनंदन !

ग्रामीण भाग आणि त्यात आपला (अकोले) तालुका आदिवासी असूनही आपल्या कॉलेजला आपल्यासारखे दूरदृष्टीचे ''प्राचार्य'' लाभले म्हणूनच खऱ्या अर्थाने हा पुरस्कार मिळाला असे आमच्या सारख्यांना वाटते. आपली मेहनत, सामाजिक बांधिलकी, नि:स्वार्थी सेवाभावी वृत्ती, 'कॉलेज एक आपले कुटुंब' यामुळेच आपण कॉलेजचा 'चेहरामोहरा' बदलून टाकला व त्यामुळेच आपल्या कॉलेजला ''प्रथम क्रमांकाचा पुरस्कार'' मिळाला व आपल्या कॉलेजचे नाव सर्वदूर पसरले.

... शिक्षणामध्ये आपल्या हातून फार मोठे योगदान घडो... आपली अशीच उत्तरोत्तर प्रगती होवो व त्यासाठी आपणास उत्तम आरोग्य व दीर्घायुष्य लाभो, हीच प्रार्थना ! पुनश्च अभिनंदन !

आपला नम्र,

*स्वाक्षरीत*

अण्णासाहेब कराळे,

कार्याध्यक्ष,

युवक क्रांती सेवाभावी संस्था, तांभोळ, ता. अकोले

**8**

दि. ११/०२/२००७

प्रति

**मा. प्राचार्य,**

अकोले महाविद्यालय, अकोले.

स. न. वि. वि.

आपल्या महाविद्यालयास पुणे विद्यापीठाच्या ग्रामीण भागातील उत्कृष्ट महाविद्यालयाचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार, चप्रमाणे आपल्या महाविद्यालयाच्या **'अगस्त्य'** नियतकालिकाला विद्यापीठ पातळीवरील द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

... आपण व आपल्या समवेत विद्यादानाचे पवित्र कार्य करणारे आपले विद्वान सहकारी या सर्वांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व संशोधन क्षेत्रात केलेली प्रगती पाहून अत्यंत आनंद झाला व मन अभिमानाने भरून आले. शैक्षणिक आकाशात आपण मारलेली ही उत्तुंग भरारीच होय !

... आपले व आपल्या सहकार्यांचे मन:पूर्वक अभिनंदन ! आपले व आपल्या महाविद्यालयाचे भाग्य असेच उत्तरोत्तर बळावत, झळाळत व उजाळत राहो, ही प्रभुचरणीं प्रार्थना !

आपला नम्र,

*स्वाक्षरीत*

भाऊसाहेब बावधनकर,

कमानवेस, अकोले

आपण जेव्हा अधिक चांगलं बनायचा प्रयत्न करतो तेव्हा आजूबाजूच्या सर्व गोष्टी अधिक चांगल्या बनतात. - पावलो कोएलो

9

दि. ११ फेब्रुवारी २००७

प्रति,

**मा.श्री. रमेशचंद्रजी खांडगे सर,**

प्राचार्य,

अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय,

अकोले, जि. अहमदनगर.

आपण कार्यरत असलेल्या अकोले महाविद्यालयास पुणे विद्यापीठ अंतर्गत ग्रामीण भागातील आदर्श महाविद्यालय हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल मी व माझे कुटुंबिय आपले हार्दिक अभिनंदन करतो.

... एका वर्षात मानाचे सलग तीन पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यात आपला सिंहाचा वाटा आहे. ... संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी आपल्यावर दाखविलेल्या विश्वासास तडा जावू न देता महाविद्यालयास आपण प्रगती पथावर नेले व पुणे विद्यापीठात ग्रामीण भागाचा ठसा उमटविला याबद्दल आपले कौतुक करावे तितके थोडेच आहे !

... पुरस्कारांची अशी संधी आपणास वारंवार मिळो व आपल्यासारख्या सर्वसाधारण कुटुंबातील माणसाची यथेच्छ प्रगती होवो, हीच परमेश्वरचरणी प्रार्थना.

आपल्या पुढील भावी यशस्वी वाटचालीसाठी आमचे घोगरे कुटुंबीयांतर्फे हार्दिक शुभेच्छा.

आपला स्नेहांकित,

स्वाक्षरीत

**उत्तमराव वामनराव घोगरे पा.**

संचालक,

अहमदनगर जिल्हा मजूर सहकारी संस्थांचा संघ, अहमदनगर

राहाता, जि. अहमदनगर.

Success is journey, not a destination. - *Ben Sweetland*





# अगस्त्य

(२००५-०६)

या नियतकालिकाबाबतच्या
निवडक व प्रातिनिधीक प्रतिक्रियातील

## मुख्यांश

**१**

अंक अतिशय दर्जेदार व सुबक मांडणीचा आहे. संपादक मंडळाने अतिशय मेहनतीने अंक तयार केल्याचे जाणवते. विद्यार्थ्यांनी सुध्दा चांगले लिखाण केले आहे.

*स्वाक्षरीत*

**- डॉ. संजय चाकणे,**
कार्यक्रम समन्वयक,
राष्ट्रीय सेवा योजना, पुणे विद्यापीठ.
(१४/०९/२००६)

**२**

आपले **अगस्त्य** हे वार्षिक नियतकालिक ज्ञानसंपन्न, उत्कृष्ट व आकर्षक असे आहे. आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वाचनासाठी ते ग्रंथालयात ठेवले आहे.

*स्वाक्षरीत*

**- प्राचार्य इंद्रजित जाधव**
कला व वाणिज्य महाविद्यालय,
घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे
(२८/०९/२००७)

**३**

या अंकाचे अंतर्बाह्य स्वरुप देखणे आणि आशयसंपन्न आहे.

अगस्त्य माहात्म्य, ज्ञानपीठ पुरस्काराची सविस्तर माहिती, विशेषतः विंदा करंदीकरांच्या काव्याचा वैशिष्ट्यपूर्ण परिचय ही बाब अंकात शोभा आणणारी आहे.

सामाजिक विषय, शेतकऱ्यांच्या आत्महत्येबाबतचे पत्र, महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांचे सचित्र दर्शन, विद्यार्थी शिक्षकांचे कर्तृत्व ह्या सर्व बाबतीत महाविद्यालयाचे प्रतिबिंब स्पष्टपणे दिसते.

*स्वाक्षरीत*

**- प्राचार्य डॉ. पंडितराव पवार**
के. के. वाघ कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
पिंपळगाव बसवंत, ता. निफाड जि. नाशिक
(०५/०९/२००६)

४

या नियतकालिकाचे मुखपृष्ठ अत्यंत कल्पक आहे.या मुखपृष्ठाची कल्पना ज्यांना सुचली व ज्यांनी ते रेखांकित केले त्यांचे हार्दिक अभिनंदन ! **अगस्त्य** या नावातील शब्दकळा चित्ररुपाने साकारली आहे, हा दुग्धशर्करायोग.

डॉ. भास्करराव खांडगे (लिखित) **शेतकऱ्याचे गृहमंत्र्यास पत्र** (व) या अंकातील (इतर) लेख, कविता त्यातील विषयांच्या अनुरोधाने वाचनीय, मननीय आहेत. हिंदी , इंग्रजी, विभागातील (काही) साहित्य विशेष उल्लेखनीय आहे.... एकंदरीत हा अंक वाचनीयच नव्हे तर संग्रहणीय झाला आहे.

**विंदावन** – (हा) खास विभाग पाहून सानंदाश्चर्य वाटले. विंदा–साहित्याचा सर्वंकष अभ्यास करुन ज्या साहित्यसंवेदनांचा विंदावनात परिचय करुन दिला आहे त्याबद्दल साहित्यप्रेमींनी आपले ऋणी असावे. ही संकल्पना महाराष्ट्रातील कुठल्याही महाविद्यालयाला सुचली असेल, असे वाटत नाही. फार तर विंदा–संबंधित एखादा लेख...बस... म्हणून **योजकस्तत्र दुर्लभः ।** अंकाची ही विशेषता फारच भावली. अंतःकरणपूर्वक अभिनंदन !

स्वाक्षरीत

**- अनंत दत्तात्रय देशपांडे**
माजी प्राचार्य,
मॉडर्न हायस्कूल व जुनियर कॉलेज,
अकोले, जि. अहमदनगर
(०३/०९/२००६)

He who does not know the force of words cannot know men. - *Confucius.*





९

शरणागत विंध्य पर्वत अगस्त्यांना प्रणिपात करण्यासाठी लवतो. परिणामीं सूर्यकिरणांचा प्रवेश दक्षिण देशी शक्य होतो. त्याच अवस्थेत नत राहण्याचा आदेश अगस्त्य देतात. या पौराणिक कथेवर आधारित मुखपृष्ठ उत्तम साधले आहे. अहंकार वाढू देऊ नकोस व थोरपणा मिरवू नकोस हे पुराणातले दाखले उद्‌धृत करून सद्‌गुरु व जनतादनार्दनाला अंक कृतज्ञतापूर्वक यथोचित समर्पित केला आहे... अंक चाळताना पंढरीच्या वारीविषयी नवीनच प्रकार वाचनात आला. प्रा. साहेबराव गायकवाड यांनी उपस्थित केलेला जलसंधारण हा अत्यंत महत्त्वाचा विषय ...... प्रा.नाईकवाडी यांचा एड्स वरील लेख डॉक्टरांनीही अभ्यासावा असा आहे. ...तंबाखू (बद्दल).... शास्त्रीय माहिती देऊन डॉ. एस. जी. बंगाळ यांनी ....काव्यरचनेव्दारे तंबाखू बहाद्दरांना फटकारले आहे....

मराठी काव्य विभागात.....युवक युवतींच्या आवडीचे विषयांना यथोचित स्थान मिळाले आहे. 'माय माझी हातातलं बळ आणि पोटातलं रक्त चालली इकायला' हे आपल्यापैकी कित्येकांना आपला स्वतःच्या आईचेच वर्णन वाटेल.

विद्यावाचस्पतींच्या प्रांतात प्रा. झांबरे व प्रा. बाणकर यांच्या शोधयात्रा....त्या त्या विषयातील जिज्ञासूंना मार्गदशक ठरतील. अंक वैविध्यपूर्ण विषयांनी नटलेला ...

विंदा करंदीकरांच्या कामगिरीनिमित्त कल्पकतेने **विंदावन** हे खास दालन उघडले आहे. ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या महाभागांची छायाचित्रे व त्यांच्या सुविचारांचे सार उद्‌धृत केलेले पृष्ठ साहित्यप्रेमींची वाहवा मिळवून जाईल. ... अंकास पारितोषिक मिळून * पुढील वर्षी हॅट्रीक करण्याची प्रेरणा मिळेल, ही अपेक्षा.

स्वाक्षरीत

**- डॉ. बी. जी. बंगाळ,**

विश्वस्त,

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी, अकोले.

(११/०९/२००६)

* मा. विश्वस्तांनी व्यक्त केलेला विश्वास पुढे खरा ठरला, हे चाणाक्ष वाचकांच्या लक्षात आले असेलच !

Great thoughts reduced to practice become great acts. - *Hazlitt*





# ... येथे कर माझे जुळती !

( माजी विद्यार्थिनी )
**सौ. शकुंतला दिलीपराव देशमुख**
बी. ए. (इं.), बी. एड्. उपशिक्षिका,
न्यु इंग्लिश स्कुल, कोल्हार बु॥, जि. अहमदनगर

सकाळची वेळ ! नेहमीप्रमाणेच घाई गडबड ! पण तरीही जगाची हाल-हवाल बघण्यासाठी 'सकाळ' हाती घेतला. पेपर चाळत असताना नजर एका बातमीवर स्थिरावली .... ''आकांक्षा पुढती जिथे गगन ठेंगणे...'' बातमी वाचून मला स्वर्ग दोन बोटे उरला !

सासरीं मुलगी कितीही सुखात असली तरी तिला माहेरच्या प्रत्येक गोष्टीत ओढ असते. प्रेम असते. आज माझ्या माहेरचं नावारूपाला आलेलं कॉलेज बघून मन मोठं झालं ! मोहरलं ! मन भूतकाळात गेलं ... आठवणींच्या रंगांची उधळण झाली, आठवणींच्या अनेक मोरपिसाऱ्यातून अकोले कॉलेजची चित्रफित हळुवारपणे मनपटलावरुन पुढे सरकू लागली ...

१९७४ साल, कोतूळसारख्या खेड्यात मॅट्रीकपर्यंतच शिक्षण पूर्ण केल्यानंतर शिक्षणाची कवाडं बंदच होती. मुलींनी दुसऱ्या ठिकाणी जाऊन शिक्षणासाठी रहावे हे खेड्यातील लोकांना त्या काळात निश्चितच रुचणारे नव्हते. पण वडील शिक्षक असल्याने ते शिक्षणाचे महत्त्व जाणत होते आणि अनायासेच अकोले येथे महाविद्यालय सुरू होणार हे समजल्यावर त्यांनी माझ्यासाठी पी.डी.आर्ट्‌समध्ये प्रवेश घेतला. त्यावेळी आम्ही ६०-७० विद्यार्थी विद्यार्थिनी होतो ...

संतवाड्यामध्ये कॉलेज सुरू झाले. कळतच नव्हते. हे कॉलेज आहे की हायस्कुल आहे असे वाटत असे. कारण फारसा फरक जाणवतच नव्हता. जवळपासच्या खेड्यातूनच बरीचशी मुले या ज्ञानगंगेच्या तीरीं पोहचली होती. कुठलीच स्पर्धा नव्हती. आम्ही सर्व एक होतो. आमच्यात जिव्हाळा निर्माण झाला होता. एकमेकांबद्दल प्रेम होतं. आणि आमचे प्राध्यापकही वेगळे नव्हते. आजचे आदर्श महाविद्यालयाचे अन् नॅककडून B ++ ग्रेड मिळवून देणारे प्राचार्य आ. रमेशचंद्र खांडगे हे आमचे त्या काळातले प्राध्यापक होते. प्रा. रासने, प्रा. गरजे, प्रा. देशमुख वगैरे असा सारा एकदिलाचा परिवार होता. एक कुटुंब तयार झालं होतं.

अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात कॉलेजचे दिवस सरले. इतर कॉलेजच्या तुलनेत अकोले महाविद्यालय अतिशय छोटेसे , जशी जागा होईल तसे तसे वाढले, वर्ग भरविले. पण आम्ही आमच्यावरच खुश होतो. मायेच्या ममतेने सांभाळणारे प्राध्यापक आम्हाला लाभले होते. इतर कॉलेजसारखी मोठी रंगीबेरंगी दुनिया जरी आमची नव्हती तरी आमच्या मनाची विलोभनीयता न्यारी होती. माणसाच माणूसपण आम्ही येथेच शिकलो ! मैत्रीची रोपटी इथेचं रुजली संकटकाळात मदतीचा हात देणे, विचारांची देवाण-घेवाण करणे हे मूल्य संस्कार याच मातीत आमच्यावर रुजले कुठल्याही प्रलोभनाशिवाय यश मिळते, हेही येथेच शिकलो.

आज बातमी वाचली अन् स्वर्ग दोन बोटे उरला. स्वतःची जागा नसताना सुरू झालेल्या या महाविद्यालयाची बघून मन सुखावलं. अद्ययावत आपली हक्काची भव्य वास्तू बांधकामाची बातमी पाहून ▸ *पृष्ठ क्रमांक २८ वर चालू*



अगस्त्य



# माझे व महाविद्यालयाचे पहिले यश !

**श्री. रमेश जगताप**
माजी विद्यार्थी

मॉडर्न हायस्कुलमधून एस्. एस्. सी. पास झालो. एस्.एस्.सी.नंतर तरुणांना अनेक मनोहरी स्वप्नं पडू लागतात. पण घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक. मी काय स्वप्नं पाहणार ? नोकरीशिवाय पर्याय नव्हता. लगेचच दुष्काळी कामावर रायटिंग मुकादमाचे काम लागले. त्यावेळची मजुरांना वाटली जाणारी सुकडी माझे मिष्टांन्न होते.

त्याचकाळात अकोले महाविद्यालय सुरू झाले. माझ्यासारख्या विद्यार्थ्याला ती एक सुसंधीच चालून आली होती. कॉलेज म्हणण्यासारखे आमचे कॉलेज नव्हतेच. मराठी शाळा बरी अशी स्थिती, जुन्या चित्रपटातील भुतबंगल्या सारख्या काही इमारती, अगस्ति विद्यालय, मॉडर्न हायस्कुलचे दत्तक कॉलेज ही आमच्या कॉलेजची प्रतिमा. परंतु असे असले तरी शिक्षणातील सकसपणा आमच्या कालेजमध्ये नक्कीच होता आणि तोच आमच्या दृष्टीने महत्त्वाचा होता.



सन १९७५-७६ च्या नियतकालिकातून घेतलेला फोटो.

मी अकोले महाविद्यालयाच्या पहिल्या बॅचचा विद्यार्थी. कॉलेजमध्ये कुठल्याही सुविधा नव्हत्या. परंतु एक जिद्द होती. अभ्यासापेक्षाही मला खेळात जास्त रूची होती. पोल व्हॉल्ट, हाय जंप, लॉंग जंप, रनिंग आणि कबड्डी यात मी प्राविण्य मिळवू शकतो, याबद्दल मला आत्मविश्वास होता. कॉलेजला स्वतःचे क्रीडांगण नव्हते, खेळासाठीचे साहित्य नव्हते. मी मिळेल त्या क्रीडांगणावर वरील खेळांचा सराव करू लागलो. त्याचदरम्यान अकोले कॉलेजच्या कबड्डी टीमचा कॅप्टनही झालो.

माझ्यातील खेळाचे प्राविण्य, त्याकाळात माझे खेळाचे शिक्षक प्रा. व्ही. पी. मोरे, माननीय प्राचार्य श्री. कऱ्हाडकर, प्रा. खांडगे, यांच्या नजरेतून सुटले नाही. त्यांचे माझ्याकडे लक्ष केंद्रित झाले व त्यांनी मला अधिक मदत व प्रोत्साहन देण्याचे ठरविले. या सर्वांच्या प्रेमामुळे प्रोत्साहित होऊन मी माझ्या खेळात प्राविण्य मिळवित गेलो. अकोले महाविद्यालयाचे वतीने मी व माझे खेळाडू मित्र, दिलीप पवार, माणिक खांबेकर यांच्यासह पुणे, बारामती, इंदापुर, नंदुरबार, धुळे, नगर, प्रवरानगर येथे मैदानी स्पर्धा गाजवल्या व अनेक बक्षिसे मिळवून विद्यापीठात अकोले महाविद्यालयाला मानाचे स्थान मिळवून दिले.

१९७६ च्या आंतरविद्यापीठ स्पर्धेत मी पोल व्हॉल्ट, हाय जंप, लॉंग जंप, भालाफेक व १५०० मीटर रनिंग या पाच खेळात प्रथम क्रमांक मिळविला व मला नगर ग्रुपची ॲथेलॅटिक्सची चॅम्पियनशिप मिळाली व परिणामी नगर ग्रुपची

Truth is always the strongest argument. - *Sophocles*





कॅप्टनशिपही मिळाली. त्यानिमित्ताने माझी व महाविद्यालयाची विद्यापीठात चांगलीच वाहवा झाली.

त्याच मोसमात पुणे विद्यापीठात नगर गुपचे प्रतिनिधित्व करून विद्यापीठात पोलव्हॉल्ट व हाय जंप या दोन खेळात द्वितीय क्रमांक मिळविला. ज्या कॉलेजमध्ये कुठल्याही प्रकारची खेळासाठी सुविधा नाही व जे कॉलेजही अद्याप मान्यवर नव्हते अशा कॉलेजचा खेळाडू हे करू शकतो याबद्दल माझं व कॉलेजचं भरपूर कौतुक झालं,

मी अकोले कॉलेजचा विद्यापीठ पातळीवर खेळणारा पहिलाच खेळाडू असल्यामुळे अकोले कॉलेजचे संस्थापक श्रध्देय दादासाहेब रुपवते यांनी त्यावर्षीच्या बक्षिस वितरण समारंभामध्ये मला स्टेजवरच हृदयाशी घेऊन माझे भरभरुन अभिनंदन केले.

माझे इंग्रजीचे प्राध्यापक व विद्यमान प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांनी देखील माझ्या खेळातील कलागुणांना वाव मिळावा म्हणून जाणीवपूर्वक प्रयत्न केले व प्रोत्साहन दिले. प्रसंगीं आर्थिक मदतही केली. मोरे सरांच्या नंतरचे माझे खेळाचे शिक्षक प्रा. शिवाजीराव दिघे यांचेही भरपूर मार्गदर्शन मला मिळाले.

माझ्या कॉलेजच्या काळात विद्यार्थ्यांची संख्या अत्यंत कमी असल्यामुळे शिक्षक आणि विद्यार्थी यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे व आपुलकीचे संबंध असायचे. त्यातच माझ्या खेळातील यशामुळे सर्वच शिक्षक व विद्यार्थी यांचा मी अत्यंत लाडका विद्यार्थी होतो.

अनेक शिक्षण संस्था ह्या धनिकांच्या मार्गदर्शनाखाली चालतात. त्यामुळे आर्थिक अडचण नसते. विद्यार्थ्यांसाठी सर्व सोयी उपलब्ध होऊ शकतात. विद्यार्थ्यांकडून भरपूर देणग्याही मिळू शकतात. परंतु अकोले तालुका एज्यकेशन सोसायटी ही शिक्षण संस्था तालुक्यातील सर्वसामान्य कार्यकर्त्यांकडून चालविली जाते. म्हणून तिला वेगळे महत्त्व प्राप्त झाले. मी वेगवेगळ्या स्पर्धेत खेळताना, शिकत असताना मला कधीही कशाचीही कमतरता कॉलेजने पडू दिली नाही. त्यामुळेच मी या महाविद्यालयातून पदवीधर होऊन बाहेर पडलो.

मी पदवीधर झालो त्यावेळेस देशात जनता पार्टीचे वारे वाहत होते. जयप्रकाश नारायण यांच्या सारखे ज्येष्ठ समाजसेवक या पार्टीचे नेतृत्व करीत होते. त्यांच्या विचाराने प्रभावित होवून देशातील सर्वसामान्य तरुण वर्ग या पक्षाकडे आकर्षित झाला होता. अकोले तालुक्यातील आदरणीय नेते दशरथरावजी सावंत यांच्या विचाराचाही प्रभाव माझ्यासारख्या तरुणावर पडला होता आणि त्यामुळेच आदरणीय सावंत साहेब, समाजवादी विचारसरणीचे नेते, आदरणीय अमृतभाई मेहता यांच्या आग्रहाखातर मी आदरणीय सावंत साहेब यांचे बरोबर १८७९ च्या जि.प. पंचायत समितीच्या निवडणुकीला उभा राहिलो. दुर्दैवाने सावंत साहेब त्या निवडणुकीत पराभूत झाले आणि माझ्या दुर्दैवाने मी विजयी झालो आणि केवळ त्यामुळेच मी या क्षेत्रात अडकला गेलो.

त्यानंतर मी २१ वर्षे पंचायत समितीवर सदस्य म्हणून काम केले, अकोले तालुका खरेदी विक्री संघ, अकोले ग्रामपंचायत, सिध्देश्वर दुध उत्पादक सहकारी संस्था या संस्थेवर सदस्य म्हणून काम केले. सध्या बुवासाहेब नवले पतसंस्था, अकोले या महाराष्ट्रातील अग्रगण्य मानल्या गेलेल्या पतसंस्थेवर व्हा. चेअरमन म्हणून काम करीत आहे.

या सर्व यशाचे श्रेय माझ्या पक्षाला, जनतेला व नेत्यांना आहेच. परंतु मला घडविणाऱ्या व माझ्या कलागुणांची कदर करणाऱ्या माझ्या महाविद्यालयालाही निश्चितपणे आहे.

माझ्यानंतर अकोले महाविद्यालयाला माझ्यापेक्षाही चांगले खेळाडू मिळाले. त्यांनीही कॉलेजला खेळात लौकिक मिळवून दिला. परंतु मी पहिला विद्यापीठात खेळणारा खेळाडू म्हणून माझ्याकडे पाहण्याचा कॉलेजचा दृष्टिकोन वेगळा होता.

कदाचित त्यामुळेच मलानंतर अकोले तालुका

The shortest way to do many things is to do only one thing at a time. - *Cecil*





एज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारिणीवर काही वर्षे काम करण्याची संधी मिळाली.

आज माझ्या कॉलेजचा 'उत्कृष्ठ म्हणून महाराष्ट्रभर गौरव होत आहे हे पाहून माझ्यासारख्या माजी विद्यार्थ्यांना अत्यानंद होत आहे. नॅकने केलेले B++ हे मूल्यांकन, ग्रामीण भागातील नंबर १ चे महाविद्यालय म्हणून मिळालेला पुणे विद्यापीठाचा पुरस्कार व याबरोबरच अनेकवेळा वेगवेगळ्या कारणाने महाविद्यालयाचा झालेला गौरव हे सारे पाहून महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. रमेशचंद्र खांडगे व त्यांचे सर्व सहकारी व मॅनेजमेंट यांच्याविषयी आदरयुक्त अभिमान वाटल्याशिवाय राहत नाही.

आता मी कधी कॉलेज परिसरातून जात असताना, उंच उभ्या असलेल्या इमारती, भव्य वाचनालय, सर्वच परिसर, डोळे भरून पाहावयास क्षणभर थांबतो आणि कॉलेजच्या विस्तृत क्रीडांगणाकडे पहात स्वत:ला शोधत असतो.

"एखादा माणूस निव्वळ
कामासाठी काम करीत आहे
असे जर मला कळले तर त्या
महाभागाच्या दर्शनासाठी मी
हातागुडघ्याने सरपटत सरपटत
कोसन् कोस जाईन."

- पृष्ठ क्र. ४,
*उच्च जीवनाची साधना* :
**स्वामी विवेकानंद**

▶ *पृष्ठ क्र.२५ वरून 'येथे कर माझे जुळती ....' चालू*

खूपच आनंद वाटला. खुले नाट्यगृहही बांधल्याचे बघून "Bishop's Candlesticks" या नाटकातल्या माझ्या भूमिकेची आठवण झाली. माझ्यातली कलारसिकताही इथेच स्फुल्लिंगली, वक्तृत्वाला आकारही येथेच मिळाला. आज मी यशस्वी अन् सुखी जीवन जगत आहे त्याच गमकही हेच महाविद्यालय आहे ! कारण कोणत्याही सुविधेशिवाय सुरू झालेल्या या कॉलेजने प्राप्त परिस्थितीत समाधान मानण्याचे आम्हाला शिकवले आहे. आज नावारुपाला आलेल्या कॉलेजच हे भरीव कार्य व गोंडस रूप बघून माझं मन अभिमानाने भरुन आलं आहे.

*इवलेसे रोप लावियेले द्वारी*
*तयाचा वेलू गेला गगनावेरी ...*

ह्या इवल्याश्या रोपट्याचे रोपण आमच्या साक्षीने लागले. त्याचा आज महावृक्ष झालेला पाहून मन थक्क झालं. . .. पुलकित झालं !

ह्या आनंद निर्मिती मागे निश्चितच माळ्याची भूमिका महाविद्यालयाचे प्राचार्य आ. रमेशचंद्र खांडगे यांचीच. हा आनंदमळा बहरास आला म्हणून अनेक वेलींवर नानाविध फुले डोलू लागली आहेत. वसंत ऋतू येतील, जातील भूमिका बदलतील. ज्यांनी केले त्यांचे श्रम निश्चितच स्मरणात ठेवायला हवेत. या कॉलेजचे अनेक विद्यार्थी येथून शिक्षण घेऊन अनेक ठिकाणी उच्च पदावर आहेत त्या सर्वांसाठी एकच आवाहन -

कधी तरी मागे वळून पहावं,
आपल्या मातीला वंदन करावं !!

Only work which is the product of inner compulsion can have spiritual meaning. - Gropius.



पुणे विद्यापीठाकडून सर्वोत्कृष्ट संलग्न (ग्रामीण) महाविद्यालय म्हणून पुरस्कार मिळाल्याबद्दल उत्स्फूर्तपणे मा.प्राचार्यांचे अभिनंदन करताना माजी विद्यार्थी
(उजवीकडून) श्री. मंडलिक, श्री. देशमुख व श्री. हासे.



श्री.राजेंद्र शहाणे, कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, अकोले, यांचेकडून होणारे सहर्ष अभिनंदन सस्मित-भावें स्वीकारताना मा. प्राचार्य रमेशचंद्र खांडगे




मातृसंस्था अ.ता.ए.सो.आयोजित आनंदसोहळ्याचे प्रास्ताविक करताना ज्येष्ठतम प्राध्यापक श्री. नंदकुमार रासने



आनंद सोहळ्याचे प्रमुख पाहुणे मा.प्राचार्य श्री.शिरगुरकर (गोवा), यांचे स्वागत करताना अ.ता.ए.सो.चे मा.अध्यक्ष श्री. विठ्ठलराव चासकर



महाविद्यालयातील नॅक सुकाणू समितीचे समन्वयक म्हणून केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल संस्थेकडून अभिनंदन पत्र स्वीकारताना प्रा.संजय ताकटे



तामिळनाडूमध्ये झालेल्या आंतरविद्यापीठ हँडबॉल (मुली) स्पर्धेत पुणे विद्यापीठ संघाचे कर्णधारपद भूषविल्याबद्दल संस्थेकडून अभिनंदन पत्र स्वीकारताना कु.सुनिता नवले



तामिळनाडूमध्ये झालेल्या आंतरविद्यापीठ हँडबॉल (मुली) स्पर्धेत पुणे विद्यापीठ संघाचे प्रशिक्षक म्हणून कामगिरी केल्याबद्दल संस्थेकडून अभिनंदन पत्र स्वीकारताना माजी विद्यार्थी श्री.सुभाष शेणकर



महात्मा फुले शैक्षणिक गुणवत्तावाढ व विकास अभियानांतर्गत कन्या विद्या मंदिरास प्रथम क्रमांक मिळाला. संस्थेचे विश्वस्त मा.श्री.भाऊसाहेब हांडे यांचे हस्ते अभिनंदनपत्र स्वीकारताना मुख्याध्यापिका सौ.अनुराधा पोखरकर



**या आनंद सोहळ्यात दादा, आज तुम्ही हवे होतात !**
अशा भावपूर्ण सद्‌गदित स्वरात अ.ता.ए.सो.चे संस्थापक कालकथित दादासाहेब रुपवते यांची कृतज्ञ स्मृती जपत आपले विचार व्यक्त करताना मा.विश्वस्त श्री.प्रेमानंदजी रुपवते.



**मा. दादासाहेब रुपवते यांचे समवेत मा. प्राचार्य, प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी मंडळ**
**(त्यावेळी महाविद्यालय नगारखाना, अकोले येथे भरत होते. तेथील फोटो.)**

दादा ! सुरुवातीला तुम्ही आम्हां सर्वांच्यात, सर्वांबरोबर होता ! (१९७५)

आणि

आता...    'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय'

म्हणून 'आपल्या' महाविद्यालयास पुरस्कार

मिळाला त्यानंतरच्या 'आनंद-सोहळ्यात' मात्र ....

**दादा ! खरे तर, आजही तुम्ही हवे होतात !**



**कालकथित दादासाहेब रुपवते**



'याचि देही याच डोळां, पाहिला आनंद सोहळा !' आपल्या इच्छेचे व प्रयत्नांचे सार्थक झाले. अशा भावस्थितीत प्राचार्य शिरगुरकरांजवळ आपले हृदगत् व्यक्त करताना संस्थेचे मा. विश्वस्त श्री. लालचंदजी शहा



आनंद सोहळ्याचे प्रमुख पाहुणे मा. प्राचार्य श्री. शिरगुरकर



मा. ॲड. वसंतराव मनकर
उपाध्यक्ष, अ.ता.ए.सोसायटी



मा. ॲड. के. बी. हांडे
सेक्रेटरी, अ.ता.ए.सोसायटी



मा. श्री. प्रविणशेठ शहा
खजिनदार, अ.ता.ए.सोसायटी



मा. श्री. हमीदभाई फारुकी
विस्तार प्रमुख, अ.ता.ए.सोसायटी



मा. श्री. सुधाकरराव देशमुख
सदस्य, कार्यकारिणी, अ.ता.ए.सोसायटी



मा.श्री.पुंजा पाटील आवारी
सदस्य, कार्यकारिणी, अ.ता.ए.सोसायटी

# विंदा करंदीकर भेट



ज्ञानपीठ पुरस्कार विजेते प्रा.डॉ.विंदा करंदीकर यांना त्यांचे निवासस्थानी पुष्पगुच्छ देताना अ.ता.ए.सोसायटीचे मा.अध्यक्ष श्री. विठ्ठलराव चासकर.



**विंदावन** - नामक विशेष सदर असलेल्या **अगस्त्य** नियतकालिकाची एक प्रत विंदा करंदीकर यांना सविनय सादर भेट म्हणून देताना मा.प्राचार्य रमेशचंद्र खांडगे



विंदा करंदीकर व सौ. करंदीकर यांचे समवेत (त्यांचे उजवीकडे) डॉ.सुनिल शिंदे, संपादक डॉ.विजय बाणकर, (त्यांचे डावीकडे) प्राचार्य रमेशचंद्र खांडगे व प्राचार्य डॉ.भास्करराव खांडगे



विंदांची भावपूर्ण,हृद्य भेट झाल्यानंतर त्यांचे निरोपाचे शब्द आदरपूर्वक श्रवण करताना अ.ता.ए.सो.चे मा.विश्वस्त श्री.प्रेमानंदजी रुपवते, प्राचार्य श्री.रमेशचंद्र खांडगे व संपादक डॉ.विजय बाणकर

# अगस्त्य (२००५-०६) प्रकाशन समारंभ



महाविद्यालयाचे नियतकालिक
**'अगस्त्य'** (२००५-०६) चे प्रकाशन समारंभी
या अंकाबद्दल तपशीलवार माहिती देताना
संपादक प्रा. डॉ. विजय बाणकर (दि.१२/८/२००६)



**'अगस्त्य'** (२००५-०६) प्रकाशित करताना
अ.ता.ए.सोसायटीचे मा.विश्वस्त श्री.प्रेमानंदजी रुपवते,
डॉ. बी. जी. बंगाळ, उपाध्यक्ष (व
माजी विद्यार्थी ) मा.ॲड. श्री. वसंतराव मनकर.



माजी विद्यार्थी व सुजाता ऑफसेट प्रिंटर्सचे
मालक श्री.सुजीत नवले यांनी **'अगस्त्य'** ची
सुबक व सुंदर छपाई करून दिली. सदर अंक
प्रकाशन समारंभी त्यांचा मा. श्री. प्रेमानंदजी रुपवते
यांचे हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार
करण्यात आला.

# अगस्तेय प्रकाशन व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र उद्घाटन




अगस्तेय या अ.ता.ए.सोसायटीच्या नियतकालिकाचे प्रकाशन करतांना -
१) मा.प्राचार्य श्री.रमेशचंद्र खांडगे
२) मा.विश्वस्त डॉ.बी.जी.बंगाळ
३) मा.विश्वस्तश्री.प्रेमानंदजी रुपवते
४) मा.उपाध्यक्ष अॅड.श्री.वसंतराव मनकर




स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची, त्याच्या कार्याची आणि पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र प्रयोग शाळांच्या विस्ताराविषयी माहिती देताना केंद्र समन्वयक व रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.संजय ताकटे



स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातील मार्गदर्शक प्रा.श्री.युवराज साळुंके, स्टडी सर्कल, पुणे यांचा सत्कार करताना अ.ता.ए.सोसायटीचे अध्यक्ष मा.श्री.विठ्ठलराव चासकर